# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २९/०८/२०२४ (गुरूवार) दुपार

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक**

**वाहनासह एकुण ४,०५,०५०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

दिनांक २८/०८/२०२४ रोजी कार्यालय उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर येथील स्टाफ पोलीस स्टेशन खापा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, मौजा करसघाट नंदापूर शिवारातील नाल्यातून एका ट्रॅक्टरमध्ये काही इसम अवैधरीत्या रेती गौणखनिज भरून चोरटी वाहतूक करीत आहे. अशा मिळालेल्या विश्वसनिय माहिती वरून करसघाट नंदापूर शिवारातील नाल्याजवळ स्टाफसह नाकाबंदी केली असता दोन इसम एका लाल रंगाच्या ट्रॅक्टरचे ट्रॉलीमध्ये रेती भरून चोरी करताना मिळुन आले. पोलिसांना पाहुन सदर आरोपी हे घटनास्थळा वरून पळुन गेले सदर ठिकाणी पाहनी केली असता १) एक महिन्द्रा सरपंच डी. एल.—५७५ कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर ज्यावरील क्रमांक खोडतोड असा असलेला कि. ३,००,०००/— रूपये २) एक लाल रंगाची ट्रॅक्टरची ट्रॉली ज्यावरील क्रमांकाची व चेचीस क्रमांकाची खोडतोड केलेली जिची किंमती १,००,०००/— रू. एक ब्रास वाळुची अंदाजे किंमती ४०००/— रू ३) तीन लोखंडी पावडे लाकडी दांडा असलेले प्रत्येकी कि.१५०/— रू प्रमाणे एकुण ४५०/— रूपये ४) तीन प्लास्टिक घमेले प्रत्येकी किंमती २००/— रू. एकुण कि.६००/— रू. असा एकुण किंमती ४,०५,०५०/—रू. चा मुद्देमाल अवैधरीत्या विनापरवाना चोरी करतांना मिळुन आल्याने घटनास्थळावरून जप्त करण्यात आला. यातील **आरोपी मालक नामे— अशोक बालाराम बम्होरे वय ४४ वर्ष रा. दुधबर्डी ता. सावनेर जिल्हा नागपूर** यास अटक करण्यात आली. अवैद्यरित्या विनापरवाना रेती गौणखनिजाचा उपसा करून चोरी करताना मिळुन आल्याने आरोपीतांविरूद्ध कलम ३०३(२), ३४६ भा.न्या.सं. सहकलम महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियमचे कलम ४८(८), सह. सार्वजनिक मालमत्ता नुकसान अधिनियमचे कलम ३ सहकलम खाण व खनिज अधिनियमचे कलम ४, २१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के सा. यांचे मार्गदर्शनात पोहवा अनिल मुंढे, पोअं नितेश पुसाम, चापोहवा महेश डंभारे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर